# मिरा-भाईंदर महानगरपालिका

स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग,
भाईंदर (प.), ता. ठाणे - 401 101 दुरध्वनी क्रं. 28192828

**पाणी पुरवठा व मलनि:सारण विभाग**

जा.क्र.मनपा/पा.पु.व मलनि/२४३२/२०२५-२६ दि.२७/११/२०२५

**प्रति,**
**जनसंपर्क अधिकारी,**
जनसंपर्क विभाग
मिरा-भाईंदर महानगरपालिका

**विषय - प्रेस नोट प्रसिद्ध करणेबाबत.**

**महोदय,**

सोबत जोडलेली प्रेस नोट महानगरपालिकेच्या वेबसाईटवर प्रसिध्द करावी.

(शरद नानेगांवकर)
**कार्यकारी अभियंता**
**पाणी पुरवठा व मलनि:सारण विभाग**
मिरा-भाईंदर महानगरपालिका

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## पाणी पुरवठा व मलनि:सारण विभाग

## // प्रेसनोट //

दि.27/11/2025

**विषय :- जलमापक यंत्र (मीटर) बंद / नादुरुस्त असलेल्या ग्राहकांनी नवीन जलमापक यंत्र (मीटर) बसविणेबाबत**

आपणास कळविण्यात येते की, सद्यस्थितीत मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मालमत्तांची पाणीपट्टी देयके काढणेकरीता जलमापकाच्या नोंदी (मीटर रीडींग) घेणेचे काम सुरु आहे. सदर जलमापक यंत्राच्या नोंदी (मीटर रीडींग) घेत असता असे निदर्शनात येत आहे की, बहुतांश ग्राहकांच्या जलजोडणीस असलेली पाण्याचे जलमापक यंत्र (मीटर) हे बंद / नादुरुस्त झालेली आहेत. अशा ग्राहकांना माहे मे ते ऑगस्ट 2025 या कालावधीच्या पाणीपट्टी देयकांमध्ये सुद्धा Faulty Meter नमुद केलेले आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण 10 नियम 1 ते नियम 18 नमुना नं.52 (नियम 68, 93) च्या तरतूदीनूसार मा. आयुक्त सो यांच्या मान्यतेने अशा जलजोडणीचे पाण्याचे जलमापक यंत्र (मीटर) बंद / नादुरुस्त पडल्यास सरासरी पद्धतीने देयक आकारण्यात येईल. तसेच जलजोडणीचे पाण्याचे जलमापक यंत्र (मीटर) सहा महिन्यापेक्षा जास्त कालावधीपेक्षा बंद असल्यास 24 तासाआधी सुचना देऊन जलजोडणी खंडीत करण्याची कारवाई करणेस प्रशासनास भाग पाडू नये.

करीता शहरातील नागरीकांनी आपल्या जलजोडणीस असलेले बंद / नादुरुस्त जलमापक यंत्र (मीटर) नवीन बसविण्यात यावे व त्याबाबतची माहिती अर्जाद्वारे महानगरपालिकेस कळविण्यात यावी, जेणेकरून मीटर नोंदीनूसार देयक आकारण्यात येईल. तरी, महानगरपालिकेस सहकार्य करावे, ही विनंती.

**(शरद नानेगांवकर)**
**कार्यकारी अभियंता**
**पाणी पुरवठा व मलनि:सारण विभाग**
**मिरा-भाईंदर महानगरपालिका**